**महाराष्ट्र जनशक्ती** ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २७७ वे | दिनांक : ०३/१०/२०२६ | वार : शनिवार


## मुंडेंचा सरकारला इशारा; विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी आंदोलनात उतरणार



**पुणे :** राज्यात आज महात्मा गांधी जयंतीचा दिवस आंदोलनांचा दिवस ठरल्याचे पाहायला मिळाले. एकीकडे मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर सीजेपीने आंदोलन करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली, तर दुसरीकडे पुण्यात MPSC विद्यार्थ्यांचे मोठे आंदोलन सुरू आहे. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात MPSC आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. यासोबतच, पुण्यातील शास्त्री रस्त्यावरील अहिल्यादेवी अभ्यासिकेजवळही स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने एकत्र येत आंदोलन पुकारले आहे. शास्त्री रस्त्यावर सुरू असलेल्या या विद्यार्थी आंदोलनाची दखल घेत माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या आणि मागण्या जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या आपण मुख्यमंत्र्यांची कानावर घातल्या असल्याचे सांगतानाच, "जर विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर मी सुद्धा आंदोलनात सहभाग होईल," असा थेट इशारा धनंजय मुंडे यांनी सरकारला दिला आहे. धनंजय मुंडे म्हणाले, माझा मुख्यमंत्र्यांशी फोनवरून संवाद झाला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात बैठकीसाठी वेळ दिला आहे, मला विश्वास आहे की विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य होतील, असा विश्वास मुंडे यांनी व्यक्त केला आहे. पुढे ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांना माझा स्वभाव माहिती आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर मी सुद्धा तुमच्यासोबत या ठिकाणी आंदोलनात सहभागी होईल, असे म्हणत एक प्रकारे सरकारला इशाराच त्यांनी दिला आहे. पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, मी आज इथे आलोय तुमचे आंदोलन पाहायला नाही, तर तुमच्यासोबत आंदोलनात लढण्यासाठी आलो आहे. हजारो विद्यार्थी रस्त्यावर आले आहेत, परीक्षेतील पारदर्शकता असेल, औषध निरीक्षक घोटाळा असेल अनेक ठिकाणी आंदोलन सुरू आहेत, हे सर्वात मोठे आंदोलन आहे. मी मुख्यमंत्र्यांना फोनवरून तुमच्या मागण्याबाबत सांगितलेले आहे. संपूर्ण माहिती सी.एम सरांना दिलेली आहे, सचिव यांनी राजीनामा द्यावा ही मागणी आहे, रखडलेला निकाल लावा, असे मुंडे यांनी म्हटले आहे. मागण्या मान्य नाही झाल्या तर..मी एकदा उतरलो की मी माघार घेणार नाही, मुख्यमंत्र्यांनी फोनवरून शब्द दिला आहे की, येणाऱ्या परीक्षेत ऑब्जेक्टिव्ह असेल. पुढच्या आठवड्यात आपल्या विद्यार्थी सोबत बैठक घेऊन आपले सर्व प्रश्न मुख्यमंत्री यांच्याकडून मान्य करून घेऊ, मागण्या मान्य नाही झाल्या तर मी इथ येऊन आंदोलन करणार, असा इशारा धनंजय मुंडे यांनी दिला आहे.

## दिनो मोरियावर अटकेची कारवाई; मिठी नदी प्रकरणात ८ तास चौकशी

**मुंबई :** मुंबईतील मिठी नदी गाळ उपसा प्रकरणाच्या तपासाला आता अभिनेता दिनो मोरिया याच्याशी संबंधित चौकशीमुळे वेगळे वळण मिळाले आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने (EOW) दिनो मोरियाला चौकशीसाठी बोलावले असून, या प्रकरणात त्याची पुन्हा चौकशी केली जात आहे. तपासादरम्यान काही संबंधित व्यक्तींशी असलेल्या संपर्काचे फोन रेकॉर्ड समोर आल्यानंतर मोरियाला चौकशीसाठी बोलावण्यात आल्याची माहिती आहे. 65 कोटींच्या कथित गैरव्यवहाराचा तपास मिठी नदीच्या गाळ उपसा कामात आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप असून, या प्रकरणात मुंबई महापालिकेला सुमारे 65.54 कोटी रुपयांचे कथित नुकसान झाल्याचा EOWचा आरोप आहे. 2021-22 आणि 2022-23 या कालावधीतील गाळ उपसा कंत्राटांशी संबंधित व्यवहार तपासाच्या कक्षेत आहेत. या प्रकरणात BMC अधिकारी, कंत्राटदार आणि मध्यस्थांसह 13 जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास यंत्रणेला दिनो मोरिया आणि या प्रकरणातील आरोपी केतन कदम यांच्यातील काही आर्थिक व्यवहारांची माहिती मिळाल्याचे वृत्त आहे. तसेच मोरिया यांचे बंधू सॅन्टिनो रोको मोरिया आणि केतन कदम यांच्या पत्नी पुनीता कदम हे एका खासगी कंपनीचे संचालक राहिले असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. त्यामुळे या व्यावसायिक आणि आर्थिक संबंधांचा तपास केला जात आहे. यापूर्वीही झाली होती चौकशी दिनो मोरिया आणि त्यांचे बंधू सॅन्टिनो यांची यापूर्वी मे 2025 मध्येही EOWने चौकशी केली होती. त्यानंतर अंमलबजावणी संचालनालयानेही या प्रकरणाशी संबंधित मनी लाँडरिंग तपासात दिनो मोरिया यांची चौकशी केली होती. कंत्राट प्रक्रियेवरही पोलिसांचा तपास EOWच्या तपासानुसार, मिठी नदीतील गाळ उपशासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट यंत्रसामग्रीच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा संशय आहे. काही कंत्राटदारांना विशिष्ट कंपन्यांकडून यंत्रे भाड्याने घेण्यास भाग पाडल्याचा आरोप तपासात करण्यात आला आहे. बनावट कागदपत्रे, कथित फुगवलेले दर आणि गाळ उपशाच्या कामाशी संबंधित नोंदींचीही तपासणी सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणात आतापर्यंत काही मध्यस्थ आणि कंत्राटदारांवर कारवाई करण्यात आली आहे. मिठी नदीच्या गाळ उपसा कामातील कथित आर्थिक गैरव्यवहाराचा तपास सुरू असून, दिनो मोरिया यांच्याशी संबंधित व्यवहार आणि संपर्कांची माहिती तपासातून पुढे येण्याची शक्यता आहे. कोण आहे दिनो मोरिया? करिअरची सुरुवात मॉडेलिंगपासून करणाऱ्या दिनो मोरियाने 'प्यार में कभी कभी' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. २००२ साली बिपाशा बासूसोबत आलेल्या 'राज' या सिनेमाने त्याला रातोरात सुपरस्टार बनवले. मध्यंतरी अभिनयातून ब्रेक घेतल्यानंतर २०२१ मध्ये त्याने 'द एम्पायर' या वेब सिरीजमधून कमबॅक केले. नुकताच तो अक्षय कुमारच्या 'हाऊसफुल ५' या चित्रपटामुळेही चर्चेत होता. मात्र, आता थेट आर्थिक घोटाळ्यात नाव आल्याने तो मोठ्या अडचणीत सापडला आहे.

## ८ तालुक्यांत ३५० पथकांकडून पीक नुकसानीचे पंचनामे; बँक खात्याची माहितीही संकलित

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात मागील ६० दिवसांपासून पावसाने उघडीप दिली असून, ६ लाख हेक्टरवरील खरीप पिके शेतातच वाळून गेली असल्याने शासनाने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला आहे. आता प्रशासनाकडून गंगापूर, सोयगाव, कन्नड, खुलताबाद, पैठण, वैजापूर, फुलंब्री आणि सिल्लोड या आठही तालुक्यांमध्ये पीक नुकसानीच्या प्रत्यक्ष पंचनाम्यांना युद्धपातळीवर सुरुवात केली असून, जवळपास ३५० पथके या कामात व्यस्त आहेत. आठवडाभरात पंचनाम्याचा अहवाल प्राप्त होताच शासनाकडे सादर करण्यात येणार असून, दिवाळीपूर्वी मदत मिळेल अशी शेतकऱ्यांना आशा आहे. तलाठी, कृषी सहायक आणि ग्रामसेवकांची विशेष संयुक्त पथके तयार करण्यात आली असून, ती थेट शेतावर जाऊन पाहणी करत आहेत. सातबाऱ्यावरील नोंद, प्रत्यक्ष शेतातील पीक, बाधित क्षेत्र आणि नुकसानीची टक्केवारी ३३ टक्क्यांपेक्षा जास्त याची काटेकोर नोंद पंचनाम्यात घेतली जात आहे. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक राहावी यासाठी शेतकरी आणि ५ पंचांच्या स्वाक्षऱ्यांसह अर्ज भरून घेतले जात आहेत. जिल्ह्यात दोन महिन्यांपासून पाऊस नसल्याने कपाशी, मका, सोयाबीन, तुरीचे पीक हातून गेले आहे. दरम्यान, फुलंब्री तालुक्यातील ९२ गावांमध्ये महसूल, कृषी आणि ग्रामपंचायत विभागाची विशेष पथके बांधावर जाऊन पाहणी करत आहेत. या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी ५ मंडळ अधिकारी व ४ विस्तार अधिकाऱ्यांना नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे. कन्नड : २०८ गावांमध्ये २०० हून अधिक कर्मचाऱ्यांचे पथक नियुक्त तालुक्यातील २०८ गावांमध्ये सुमारे १ लाख हेक्टरवरील पिके नष्ट झाली आहेत. तहसीलदार सारिका भगत यांनी बैठक घेऊन ५८ ग्राम महसूल अधिकारी, ३७ कृषी सहाय्यक, १० मंडळ अधिकारी आणि ८५ ग्रामसेवकांना दिरंगाई न करता तातडीने अहवाल सादर करण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ ऑक्टोबर २०२६


## समृद्धी महामार्गावर अपघात; पुण्याचे दोन सॉफ्टवेअर इंजिनिअर व २२ महिन्यांच्या चिमुरड्याचा मृत्यू, चालकावर गुन्हा दाखल

**दौलताबाद (जावेद अहमद) :** समृद्धी महामार्गावर दि २६ सप्टेंबर रोजी माळीवाडा जवळ कंटेनर आणि कारचा अत्यंत भीषण अपघात झाला होता. कंटेनर चालकाच्या निष्काळजीपणामुळे आणि वाहतूक नियमांच्या उल्लंघनामुळे पुण्यातील एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये पती, पत्नी आणि त्यांच्या अवघ्या २२ महिन्यांच्या निष्पाप मुलाचा समावेश असून, या घटनेमुळे जालना आणि पुणे परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी दौलताबाद पोलीस ठाण्यात कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.एकाच कुटुंबावर काळाचा घाला; दोघे होते सॉफ्टवेअर इंजिनिअरअपघातातील मृत प्रतीक रामकिशन जगदाळे (वय ३१), श्रिया प्रतीक जगदाळे (वय ३२)रुद्रांश प्रतीक जगदाळे (वय २२ महिने)हे सर्वजण सध्या मुळशी (पुणे) येथे राहत होते, तर ते मूळचे जालना येथील रहिवासी होते. प्रतीक आणि श्रेया हे दोघेही पुण्यात एका नामांकित खाजगी कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत होते. प्रतीक यांचे वडील अ‍ॅड. रामकिशन जगदाळे (रा. जालना) यांनी याप्रकरणी पोलिसांत अधिकृत तक्रार दिली आहे.इंडिकेटर न देता अचानक बदलली लेनमिळालेल्या माहितीनुसार, जगदाळे कुटुंब आपल्या कारने (क्र. MH 12 YS 1028) नाशिककडून नागपूरच्या दिशेने प्रवास करत होते. २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:३० च्या सुमारास समृद्धी महामार्गावरील चॅनेल क्र. ४४९ वर माळीवाड्याजवळ हा अपघात घडला. त्यांच्या पुढे चालत असलेल्या कंटेनरच्या (क्र. GJ 21 Y 3362) चालकाने कोणतीही पूर्वसूचना किंवा इंडिकेटर न देता आपली लेन अचानक बदलली. महामार्गावर कारचा वेग जास्त असल्याने, प्रतीक यांना कार नियंत्रित करता आली नाही आणि कार थेट कंटेनरच्या मागील भागात जाऊन जोरात धडकली.कारचा चक्काचूर; सुरक्षा नियमांचे उल्लंघन ठरले काळहा अपघात इतका भीषण होता की कार कंटेनरच्या खाली घुसली आणि तिचा संपूर्ण चक्काचूर झाला. यामध्ये तिघेही गंभीररित्या जखमी झाले होते. महामार्ग पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.प्रतीक चे वडील अ‍ॅड. जगदाळे यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, अपघातग्रस्त कंटेनरला केंद्रीय मोटार वाहन नियम (CMVR) १९८९ च्या नियमांनुसार आवश्यक असलेले 'रिअर अंडररन प्रोटेक्शन डिव्हाइस' (RUPD - सेफ्टी बॅरिकेड) बसवलेले नव्हते. जर कंटेनरला कायद्यानुसार मजबूत सेफ्टी गार्ड असते, तर कार ट्रकच्या खाली घुसली नसती आणि तिघांचे प्राण वाचू शकले असते. सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून वाहन चालवल्याप्रकरणी कंटेनर चालकाविरुद्ध मोटार वाहन कायद्याच्या कलम १९० अन्वये आणि इतर कलमांखाली दौलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## इकरा पब्लिक स्कूलमध्ये व्यक्तिमत्त्व विकास सेमिनार उत्साहात



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, जळगाव येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाच्या उद्देशाने व्यक्तिमत्त्व विकास सेमिनारचे आयोजन करण्यात आले.प्रसिद्ध लाइफ कोच व ट्रेनर एजाज शेख यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना आत्मविश्वास,ध्येय निश्चिती आणि व्यक्तिमत्त्व विकासाबाबत मार्गदर्शन केले.या वेळी एजाज शेख यांनी विद्यार्थ्यांचे स्वयंमूल्यांकन करून घेतले.विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमता,गुण, कमतरता आणि भविष्यातील ध्येय यांचा विचार करण्यास प्रवृत्त करण्यात आले.तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील ध्येय विचारून त्यांना योग्य दिशेने वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शन केले.आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात त्यांनी स्टेज डेरिंग, आत्मविश्वास, मानसिक आरोग्य, निर्णयक्षमता आणि एकाग्रता या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.एकाग्रता वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना अनेक उपयुक्त टिप्सही त्यांनी दिल्या.सेमिनारदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले.एजाज शेख यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करत त्यांना सकारात्मक विचारसरणी, आत्मविश्वास आणि सातत्याने प्रयत्न करण्याचे महत्त्व समजावून सांगितले.यावेळी एजाज शेख यांनी सांगितले की, यशासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून प्रभावी व्यक्तिमत्त्व, आत्मविश्वास, योग्य निर्णयक्षमता आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचाही तितकाच महत्त्वाचा वाटा असतो.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य शेख शकील यांनी एजाज शेख यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या मार्गदर्शनपर सेमिनारमुळे त्यांना आत्मपरीक्षण, ध्येय निश्चिती आणि व्यक्तिमत्त्व विकासाबाबत महत्त्वपूर्ण दिशा मिळाली.

## माळीवाडा ग्रामसभेत १३६ महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्राची मंजुरी




**मौजे माळीवाडा :** महिला शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्राबाबत मौजे माळीवाडा येथे विशेष ग्रामसभा घेण्यात आली. ग्रामसभेत प्राप्त अर्जांची कार्यवाही पूर्ण करून १३६ महिला शेतकऱ्यांना मंजुरी देण्यात आली असून, त्यांचे प्रमाणपत्र तयार करण्यात आले.राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व भारतरत्न लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त विशेष ग्रामसभा घेण्यात आली जलसंधारण,जलसंवर्धन व पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत ग्रामस्थांनी जल प्रतिज्ञा घेतली.गावातील उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि भावी पिढीसाठी जलसंपत्ती जपणे याबाबत सर्वांनी सामूहिक संकल्प केला.तसेच VB-GRAM-G योजनेचा कृती आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक माहितीबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन व माहिती देण्यात आली. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थांचा सहभाग,स्थानिक गरजा आणि उपलब्ध साधनसंपत्ती यांचा विचार करून प्रभावी कृती आराखडा तयार करण्याबाबत चर्चा करण्यात आली.संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविणे बाबत चर्चा करण्यात आली.माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी ठराव मंजूर करण्यात आला.मुख्यमंत्री ग्राम समृद्ध अभियान टप्पा क्रमांक-2 प्रभावीपणे राबवण बाबत ठराव मंजूर करण्यात आला.महिला शेतकरी सक्षमीकरण, महिला शेतकरी यादी मंजुरी देण्यात आली.प्रत्येक महिला बचत गटांना शासकीय बँकांकडून कर्ज मंजूर करण्यासाठी ठराव मंजूर करण्यात आला.मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत सिमेंट बंधारे कोल्हापुरी बंधारे व गाव तलाव पाझर तलाव यांना गेट टाकण्याचा ठराव घेण्यात आला.यावेळी प्रशासक ओ. पी. चव्हाण, माजी सरपंच ज्योतीताई मुळे, ग्रामपंचायत अधिकारी बाळकृष्ण गव्हाणे,उपसरपंच मनेश गाजरे, ग्रामपंचायत सदस्य धम्मपाल गायकवाड, कडू कीर्तीकर, प्रवीण बर्डे, पोलीस पाटील प्रमोद साठे, शालेय समिती माजी अध्यक्ष नंदकिशोर मुळे, जिल्हा परिषद मुख्याध्यापक फिरोज तडवी गणेश अस्वार,भगवान बनसोडे यांच्यासह गावातील नागरिक, बचत गटातील महिला, अंगणवाडी सेविका,मदतनीस, आशाताई व अर्जदार महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ ऑक्टोबर २०२६

## बिरसा ब्रिगेडच्या परभणी जिल्हाध्यक्षपदी दिलीप माघाडे यांची निवड



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** बिरसा ब्रिगेड संघटनेच्या परभणी जिल्हाध्यक्षपदी दिलीप अशोकराव माघाडे यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत ही जबाबदारी सोपविली.दिलीप माघाडे हे जिंतूर तालुक्यातील ब्रह्मणगाव येथील असून, सामाजिक व जनहिताच्या विविध प्रश्नांवर ते सातत्याने कार्यरत आहेत. आदिवासी समाजाचे प्रश्न, सामाजिक न्याय, शिक्षण, आरक्षण तसेच ग्रामीण भागातील नागरिकांच्या विविध समस्यांसाठी ते काम करत आहेत.परभणी जिल्ह्यात बिरसा ब्रिगेड संघटनेची कार्यकारिणी अधिक मजबूत करून आदिवासी समाजातील युवकांना संघटित करण्यासाठी तसेच समाजाच्या विविध प्रश्नांना शासन दरबारी प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष दिलीप माघाडे यांनी सांगितले.त्यांच्या निवडीबद्दल विविध सामाजिक संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते व मित्रपरिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## शैक्षणिक प्रवासात गुरुजनांचे मार्गदर्शन महत्वाचे -प्रा.सुरेशदाजी बिराजदार



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील बलसूर येथील श्री.छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (ता.एक) पर्यावरण दिन व ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्ताने सेवानिवृत्त शिक्षक किसन पुजारी यांच्या अमृत महोत्सवानिमित्त व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा . सुरेश (दाजी )बिराजदार होते. यावेळी साहित्यिक रजनीश जोशी, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज, ह.भ.प.आशुतोष महाराज,प्राचार्य सतीश वाकडे, कोषाध्यक्ष दत्तात्रय बिराजदार, संचालक मारुती अंबेकर, सेवानिवृत्त प्राचार्य जी.एस.देवणे, जी.एस.वाकडे, सुरेश बिराजदार, डॉ.खंडाळकर , पी.टी.कांबळे , बालाजी अंबेकर, विकास गोरे आदींची उपस्थिती होती. संस्थेचे माजी अध्यक्ष मा.श्नी.माणिकराव (आप्पा) बिराजदार, शंकरराव गोबारे, भालचंद्र बाबळसुरे, हरी शिंदे ,श्नीमंतराव मदणे, बाबुराव मुडमे आदी जेष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना प्रा. बिराजदार म्हणाले की, शैक्षणिक प्रवासामध्ये गुरुजनांचे मार्गदर्शन सर्वात महत्त्वाचे असून, विद्यार्थ्यांनी आई-वडील व गुरुजनांचा आदर करावा. श्नी. जोशी म्हणाले की, पर्यावरणाचे समतोल राखण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची असून आपल्या भागात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे जतन करणे काळाची गरज आहे. प्रा बिराजदार, डॉ .खंडाळकर, पी.टी.कांबळे, मदणे , पुजारी आदींनी मनोगत व्यक्त केली. प्रास्ताविक गुरुलींग वाकडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा.परमेश्वर सूर्यवंशी यांनी तर आभार प्रा.बी.टी.जाधव यांनी मानले. प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## महात्मा गांधींचे विचार अभिनव भारतासाठी उपयुक्त



**जालना :** महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या विचारांची आजच्या पिढीला नितांत गरज असून, त्यांच्या विचारांतून अभिनव भारताच्या निर्मितीसाठी प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा. स्मिता निर्मल यांनी केले.महात्मा गांधी आणि स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.त्या म्हणाल्या की, 'लगान' चित्रपटातील शेतकऱ्यांच्या अन्यायकारक करप्रणालीविरोधातील संघर्ष आजच्या तरुणाईला परिचित आहे. मात्र, स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय, आर्थिक शोषण आणि कर्जबाजारीपणाविरोधात महात्मा गांधींनी केलेला खेडा सत्याग्रह याचीही आजच्या 'जेन-झी' पिढीने जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अन्यायाविरुद्ध सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने लढा देण्याची प्रेरणा गांधीजींच्या कार्यातून मिळते.आज विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठविणारे सोनम वांगचुक परिचित आहेत. त्याचप्रमाणे, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी, जनसामान्यांना संघटित करण्यासाठी आणि अन्यायाविरुद्ध सत्याग्रहाच्या माध्यमातून अहिंसक संघर्ष उभारण्यासाठी महात्मा गांधींनी केलेले कार्य समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे, लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी जिद्द आणि संघर्षाची प्रेरणा घ्यावी, असे सांगताना त्या म्हणाल्या की, बालपणीच वडिलांचे छत्र हरवल्यानंतर प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करणारे शास्त्री पुढे देशाचे पंतप्रधान झाले. विपरीत परिस्थितीवर मात करून शिक्षण पूर्ण करणाऱ्या या महापुरुषांनी ज्ञानाच्या बळावर देशाच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान दिले. आजच्या विद्यार्थ्यांसमोर अनेक शैक्षणिक आणि भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे आपल्या ध्येयासाठी जिद्दीने प्रयत्न करण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून घेणे आवश्यक आहे.या कार्यक्रमाच्या प्रारंभी इंग्रजी विभागप्रमुख प्रा. विलास भूतेकर यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी प्रा. डॉ. कालिदास सूर्यवंशी, प्रा. राजक्रांती वलसे, प्रा. अशोक काकडे, प्रा. सचिन चव्हाण, प्रा. डॉ. मोहिनी रायबागकर, प्रा. आशा पांडे, प्रा. योगिता ढेंगळे, प्रा. निधी तिवारी, प्रा. चंद्रकांत धोत्रे यांच्यासह श्री. विजय लोणकर, श्री. राम हिवरेकर, श्री. अजय जोशी, श्री. नरेंद्र देशमुख, श्री. विनोद पवार, श्री. शिवाजी जोशी, श्रीमती ज्योती धांडे, श्रीमती यशोदा डिघे, श्रीमती चैताली पाटील, श्रीमती विमल रिसवाल, श्री. सुरेश शिराळे, श्री. रोहन वर्तले, श्री. आकाश कुलकर्णी, श्री. सतीश सोनवणे, श्री. काशीनाथ खलसे, श्री. अनिल जाधव तसेच वसतिगृहातील बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

## राजीव गांधी महाविद्यालयामध्ये महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन

**करमाड :** भारतीय संस्कृती संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद संचलित राजीव गांधी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, करमाड, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती दिनानिमित्त ऑनलाइन Google Meet द्वारे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.एस. एस. मुळे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक/ व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. स्वप्निल बोधने, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, प्रतिष्ठाण महाविद्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मनोज देवकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी ऑनलाइन माध्यमातून सहभागी झालेल्या सर्व मान्यवरांचे, प्राध्यापकांचे आणि विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. रमेश कचरे यांनी केले. त्यांनी महात्मा गांधी आणि लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीचे महत्त्व स्पष्ट करताना गांधीजींच्या विचारांचा आजच्या सामाजिक व लोकशाही जीवनाशी असलेला संबंध अधोरेखित केला.यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. स्वप्निल बोधने यांनी "महात्मा गांधींचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान आणि आजची लोकशाही" या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. गांधीजींच्या सत्याग्रहामागील सत्य, अहिंसा, नैतिकता आणि लोकसहभाग या मूलभूत तत्त्वांची त्यांनी माहिती दिली. सत्याग्रह हा केवळ स्वातंत्र्यलढ्यातील संघर्षाचा मार्ग नसून अन्यायाविरुद्ध शांततापूर्ण आणि अहिंसक पद्धतीने भूमिका मांडण्याचे तत्त्वज्ञान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.आजच्या लोकशाही व्यवस्थेत मतभेद, संवाद, नागरिकांचा सहभाग, सामाजिक सलोखा आणि अहिंसक मार्गाने विचार मांडण्याचे महत्त्व यावरही त्यांनी प्रकाश टाकला. लोकशाहीमध्ये विविध विचारांना स्थान असते; मात्र मतभेद व्यक्त करताना संविधानिक मूल्ये, शांततापूर्ण संवाद आणि परस्पर सन्मान यांचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.०२ ऑक्टोबर हा दिवस महात्मा गांधी जयंतीबरोबरच आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणूनही पाळला जात असल्याच्या पार्श्वभूमीवर गांधीजींच्या अहिंसेच्या विचारांचे जागतिक महत्त्व अधोरेखित करण्यात आले. गांधीजींचे विचार केवळ इतिहासाचा भाग नसून आजच्या समाजासाठीही मार्गदर्शक ठरू शकतात, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रोफेसर डॉ. एस. एस. मुळे यांनी अध्यक्षीय समारोप करताना विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या जीवनातील सत्य, अहिंसा, स्वच्छता, शिस्त, सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांचा आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.किशोर काळे यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. प्रशांत माठे यांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन करणारे प्रमुख व्याख्याते, कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व प्राध्यापकवृंद,संशोधक आणि ऑनलाइन माध्यमातून सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आभार मानले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक व महाविद्यालयातील सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ ऑक्टोबर २०२६


## माधुरी पाटील प्रकारणातील निर्देश शासनाने दुर्लक्षित केल्या मुळे मराठा आरक्षण प्रकारणात शासनावर ही वेळ आली -राजेंद्र दाते पाटील

**(मुंबई) प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर विभागातील व राज्यातील दि.२०ऑगस्ट २०२६ पूर्वी अवैध झालेल्या जात प्रमाणपत्र पडताळणीचे बाबत रिट याचिका उच्च न्यायालयातच चालवाव्या लागणार आहेत.ही बाब सातत्याने गेली एक दशका पासुन जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील मराठा सांगत असुन आरक्षण विषयी पडताळणी बाबत राज्य शासनास घटनात्मक व कायदेशीर बाबी लक्षात घ्याव्या लागतील नव्हे मराठा आरक्षण माधुरी पाटील प्रकारणातील निर्देश शासनाने दुर्लक्षित केल्या मुळे "शासनावर पीछे हट "ही होण्याची वेळ आली असल्याचे मत त्यांनी नोंदवले आहे.त्यांनी ९ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट २०२६ पर्यंत १६ दिवसाच्या अन्नत्याग आंदोलन उपोषणा वेळी त्यांनी अनेकदा माध्यमातून व विभागीय आयुक्तांच्या ७ ऑगस्ट २०२६ च्या जम्बो मेगा बैठकीत कु माधुरी पाटील विरुद्ध महाराष्ट्र या प्रकारणात सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश राज्य शासनास बंधन कारक कसे आहेत हे सविस्तर पणे विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांना पुराव्या सह लक्षात आणुन दिलेले होते शिवाय याचा उल्लेख तर ते सातत्याने करतच असतात. शासनाला यात प्रत्यक्ष कागदावर कायद्याने हस्तक्षेप करण्याचा अधिकार पूर्वीही नव्हता आणि आता सुद्धा नाही. जात पडताळणी समितीने दिलेल्या निर्णया विरुद्ध उच्च न्यायालयात रिट पिटिशन दाखल करावी लागायची.शासनाने दि.२२जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती,भटक्याजमाती इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग (जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी नियमन) अधिनियम, २००० मध्ये दुरुस्ती करून जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरुद्ध विभागीय आयुक्त यांचे अपील प्राधिकरण करून त्याचा शासन निर्णय १० ऑगस्ट २०२६ पासून अमलात आणला आहे. सदरची दुरुस्ती पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नसल्याने आता या रिट पिटिशन उच्च न्यायालयात चालवाव्या लागणार असल्याची माहिती सर्वोच्च आणि उच्च न्यायालयात मराठा समाजाच्या वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दिली असुन शासनाने विभागीय आयुक्त स्तरावर एक सदस्यीय अपील प्राधिकरण केले आहे त्यातएक संशोधन अधिकारी व एक विधी अधिकारी असे तीनसदस्यीय प्राधिकरण असणे आवश्यक आहे. बहुतांश विभागीय आयुक्त हे महाराष्ट्रा बाहेरचे असतात.त्यांना स्थानिक व्यवसाय आधारित जात रचना,चालीरीती, मानववंश शास्त्र,देव दैवत,रूढी परंपरा देवक यांची परिपूर्ण माहिती असणे अपेक्षित नसते आणि विशेष म्हणजे या अधिकाऱ्यांचे बहुसंख्य पणे कायदे विषयक पार्श्वभूमी नसते.याशिवाय विभागीय आयुक्ताकडे महसुली दाव्याचे कामकाज देखील प्रचंड प्रमाणात असते. त्यामुळे गतिमानता व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणे असे अनेक प्रश्न निर्माण होतील.सर्वोच्च न्यायालयाने दयाराम प्रकारणात केलेल्या उल्लेखा बाबत मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता व मराठा आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणतात की,माधुरी पाटील संदर्भित आदेशाचा संबंधित भाग:"कुमारी माधुरी पाटील यांच्या प्रकरणात एकूण पंधरा निर्देश देण्यात आले होते, जे आमच्या मते स्वरूपतः कायदेनिर्मितीशी संबंधित (लेजिस्लेटिव्ह) आहेत. आमच्या मते, जरन्यायालयाला असे वाटत असेल की एखादा कायदा केला जावा,तर ते त्याबाबत केवळ विधिमंडळाला शिफारस करू शकते,परंतु ते स्वतः कायदा करू शकत नाही. ती शिफारस स्वीकारायची की नाही, हे विधिमंडळावर अवलंबून असते.कुमारी माधुरी पाटील प्रकरणात, या न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने निर्देश क्रमांक १३ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले होते:"उच्च न्यायालयाने ही प्रकरणे शक्य तितक्या लवकर,म्हणजेच तीन महिन्यांच्या कालावधीत निकाली काढावीत.जर त्यांच्या कार्यपद्धती नुसार, रिट याचिका किंवा संकीर्ण याचिका/प्रकरण एकल न्यायाधीशाद्वारे निकाली काढले गेले, तरत्या आदेशाविरुद्ध खंडपीठा कडे (डिव्हिजन बेंच) पुढील अपील करता येणार नाही;मात्र, अनुच्छेद १३६ अन्वये विशेष परवानगी(स्पेशल लिव्ह ) मिळवण्याच्या तरतुदीस हे अधीन असेल."पुढे सातत्याने जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केल्या प्रमाणे,यापूर्वी दिलेले निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने नमूद केलेले आहे की जात पडताळणी समितीने दिलेला निर्णय अंतिम राहील तो केवळ संविधानाच्या परिच्छेद २२६ अंतर्गत होणाऱ्या कारवाईच्या आधी असेल.त्या मुळे आता तरी शासनाने अभ्यासकांच्या मांडणी कडे घटनात्मक रित्या लक्ष देणे गरजेचे असुन या सर्व भूमिकांचे पाठपुरावा कामी मदत करण्याची महत्वाची भूमिका रामचंद्र शेडगे,राजन घाग,रुपेश मांजरेकर, सदाशिव बानुगडे, संतोष शेजवळ,मारुती देसाई,राकेश वासुदेव,संतोष दळवी, पांडुरंग रोडे,सुभाष देसाई, दिनेश पवार, शैलेश शिंदे सुशील निकम,विवेक शिंदे,सूर्याजी सोनूवले,सुभाष पाटील,अंतोष कांबळे,रवींद्र शिंदे,दत्ता शेळके,अर्चना गायकर,नंदा शिर्के,सुरेखा रांजणे,उषा शेडगे या सह अनेक मान्यवरांनी मोलाची भूमिका पुढे येत आहे.

## अभिजात मराठी भाषा दिनानिमित विशेष काव्य मैफलीचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** टेरेसवरील कविता परिवार आणि ध्यास गझल समूहातर्फे शनिवार ३ ऑक्टोबर रोजी सदरील काव्य मैफल कवी संजय पवार यांच्या निवासस्थानी,हाऊस नं.१५/४ एन -११,मयूर नगर हडको छ.संभाजीनगर येथे संपन्न होईल३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान दरवर्षी राज्यात 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा केला जातो.या औचित्याने कवितेच्या माध्यमातून माय मराठीचा गौरव करण्यात येईल.या मैफलीत शहरातील आणि शहराबाहेरील नामांकित कवी सहभागी होतील.तरी काव्य प्रेमी रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन समूहाचे संस्थापक कवी गिरीश जोशीआणि आयोजक कवी संजय पवार ह्यांनी केले आहे.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## आयुष्याची शाळा

आयुष्याची शाळा आहे,
जगी सुख दुःखाने भरलेले.
अफाट मेहनत केल्यास,
दिसते कष्टावर तरलेले. १

म्हणून म्हणतो मित्रांनो,
न थकता कष्ट करावे.
कष्ट करून जीवनात,
मनासारखे सप्तरंग भरावे. २

संकटकाळात स्वतःला,
संघर्ष करून सिद्ध करावे.
अचानकच येतील संकटे,
भिडून त्यांना पुरून उरावे. ३

समाज काय म्हणेल म्हणून,
कशाला विचार करत बसतो.
यशस्वी झाल्यावर जळणारा,
तुझ्या हाती हात देऊन हसतो. ४

ऊन,वारा,पाऊस झेलतांना,
वृक्षा-सारखे ताठ उभे रहावे.
स्वतः सोबत समाजालाही,
आनंदात फुलतांना पहावे. ५

करू नको कोणाचीच पर्वा,
संकटांशी संघर्ष करतांना.
छातीला माती लावून लढ!
संकटे दिसतील पळतांना. ६



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ ऑक्टोबर २०२६


## श्री व्यंकटेश पब्लिक स्कूलमध्ये गांधी-शास्त्री जयंती उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल भारतमाता नगर बीड बायपास छत्रपती संभाजीनगर महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.आज श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल मध्ये कार्यक्रम अध्यक्ष श्री संस्थेचे कोषाध्यक्ष श्री दादासाहेब पाटील, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष श्री किरण पाटील साहेब यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री विजय गावंडे सर उपस्थित होते.प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जेष्ठ शिक्षक संभाजी भोसले सर यांनी सखोल माहिती दोन्ही नेत्यांच्या जीवनातील कार्य अनुभव सांगितले. तसेच श्रीमत पुष्पा पवार मॅडम, सौ.अनुराधा बोरुडे मॅडम, विजया दारुन्टे मॅडम,उपस्थित होत्या, सुत्रसंचलन प्रशांत गायकवाड सर यांनी केले तर आभार श्री मनगटे सर यांनी मांडले, तर सचिन शिंदे सर , पडवाल सर, देशमुख सर, सचिन घुले सर, धनवे सर, जुबडे सर खेरे सर, कर्मचारी संतोष बोडखे राजु बारसे, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



**फुलंब्री :** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथे राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्ते संजीवकुमार पांचाळ म्हणाले, महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व करत असतानाच भारताच्या विकासाचा विचार मांडला होता. ग्रामीण भारताचा विकास करणे हे त्यांचे ध्येय होते. भारतातील पंचायत व्यवस्था, ग्रामस्वच्छता, श्रमाला महत्व, ग्रामीण कौशल्याचा विकास, ग्राम उद्योगांचा विकास, स्वावलंबन याला गांधीजींनी महत्व दिले होते. साधी राहणी व उच्च विचाराला प्राधान्य दिले. गावाचा विकास झाला तर देशाचा विकास होईल यावर त्यांचा भर होता. यासोबतच लाल बहादूर शास्त्री हे एक गांधीजीच्या विचाराने चालणारे स्वातंत्र्य सेनानी होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर व पंडित जवाहरलाल नेहरूंच्या निधनानंतर लालबहादूर शास्त्री भारताचे दुसरे पंतप्रधान बनले. जय जवान जय किसान हा नारा त्यांनी दिला. सैनिकांना आणि शेतकऱ्यांना राष्ट्रीय उभारणीमध्ये महत्वाचे स्थान दिले. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर ताश्कंद येथे झालेल्या करारा दरम्यान त्यांचे निधन झाले. लालबहादूर शास्त्री हे अत्यंत संवेदनशील व्यक्तिमत्व होते. असे विचार या प्रसंगी डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी मांडले.कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केला. त्यांनी जयंती निमित्ताने आपण चिंतन करण्याची गरज व्यक्त केली. महात्म्यांच्या विचारांचे चिंतन करून आपली कृती आपण केली पाहिजे. आपल्यात सकारात्मक बदल घडून आणला पाहिजे असा विचार त्यांनी मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## कन्नडमध्ये तालुकास्तरीय कविसंमेलनाचे आयोजन

**कन्नड :** सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय कन्नड, बाळासाहेब पवार फाउंडेशन, त्रैमासिक तिफण आणि शिवाजी महाविद्यालय कन्नडच्या मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय भव्य कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा गांधी जयंती आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या द्वितीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून हे कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे.हे कविसंमेलन शनिवार दिनांक ३ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी एक वाजता स्नेह नगर येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयात होणार आहे. या कविसंमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध कवी डॉ. शिवाजी हुसे यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ कवयित्री डॉ. प्रतिभा अहिरे या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. प्रसिद्ध कवी डॉ. रामचंद्र झाडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून अनिता राठोड आणि प्रवीण दाभाडे हे सूत्रसंचालन करणार आहेत.या कविसंमेलनात कन्नड तालुक्यातील छत्तीसहून अधिक कवी कवयित्री सहभागी होणार असून तालुक्यातील साहित्य चळवळीला बळ देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. यामध्ये शुभदा देवरे, अपर्णा घाटबळे, प्रकाश शहरवाले, ब्रम्हगिरी गोस्वामी, रामेश्वर मोरे, दत्ता मोरस्कर, अरुण थोरात, विवेकानंद सुकाळे, ज्ञानेश्वर गायके, युवा कादंबरीकार लक्ष्मण वाल्डे, संदीप वाकडे, अमोल मोकासे, सुभाष काळे, भारत सोनवणे, अजय दवंडे, प्रभात शेळके, जनार्दन गोरे, सागर महाराज दहातोंडे, भगीरथ अंधानेरकर, अनिता राठोड, पुजा चव्हाण, आदिती चव्हाण, संकेत निकम, मथुरा काकडे, समृद्धी मोतिंगे, अक्षरा चव्हाण, ऋषिकेश आव्हाळे आणि इब्राहिम पठाण यांसह अनेक कवी आपल्या कविता सादर करणार आहेत.हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून कन्नड तालुक्यातील सर्व साहित्यप्रेमी, लेखक, वाचक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांनी समाजासमोरील प्रश्नांवर नावीन्यपूर्ण उपाय शोधावेत: प्रा. डॉ. भास्कर साठे




**उमरगा :** विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकीय ज्ञानावर अवलंबून न राहता समाजासमोरील प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर नावीन्यपूर्ण व उपयुक्त उपाय शोधण्याचा प्रयत्न करावा. संशोधनातून विद्यार्थ्यांच्या कल्पनांना वैज्ञानिक दिशा मिळते आणि त्यांच्यात चिकित्सक विचार व नवोपक्रमाची दृष्टी विकसित होते, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. भास्कर साठे यांनी केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन गुरुवार एक ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. भास्कर साठे बोलत होते.धाराशिव जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. जवळपास २७८ हून अधिक संशोधन मॉडेल व पोस्टरचे सादरीकरण करण्यात आले. विज्ञान व तंत्रज्ञान, मानव्यविद्या, सामाजिकशास्त्रे, वाणिज्य, कृषी आदी विविध क्षेत्रांतील संशोधन प्रकल्पांचे मॉडेल व पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण करण्यात आले. तज्ज्ञ परीक्षकांनी प्रकल्पांचे मूल्यमापन केले. या जिल्हास्तरीय स्पर्धेत निवड झालेल्या मॉडेल आणि पोस्टरला विद्यापीठ स्तरावर सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देणाऱ्या या आविष्कार स्पर्धेमुळे महाविद्यालय परिसरात दिवसभर संशोधन व नवोपक्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. संजय अस्वले होते. डॉ. विनोद देवरकर यांनी सूत्रसंचालन केले तर उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले यांनी आभार मानले.यावेळी विद्यापीठ आविष्कार समन्वयक प्रा. प्रविण यन्नावार, डॉ. प्रभाकर उंद्रे, डॉ. ओंप्रकाश जाधव,डॉ. नितीन पडवळ, डॉ. बी. एच. जावळे यांच्यासह विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, मार्गदर्शक, प्राध्यापक व संशोधक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ ऑक्टोबर २०२६


## महात्मा गांधींच्या विचारांचा अभ्यास करून चांगले नागरिक घडवा. प्राचार्य डॉ. संजय अस्वले



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या वतीने महात्मा गांधी जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याला आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाला अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महात्मा गांधींच्या विचारांचा आणि कार्याचा अभ्यास व संशोधन प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले.महात्मा गांधींचे सत्य, अहिंसा, स्वावलंबन, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीचे विचार आजही समाजासाठी मार्गदर्शक आहेत. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांचा केवळ अभ्यास करून नाही, तर तो प्रत्यक्षात आपल्या आचरणात आणल्यास जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडण्यास मदत होईल, असे डॉ. अस्वले यांनी सांगितले.उपस्थितांनी गांधीजींच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या मूल्यांचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे समन्वयक डॉ. पी. के. गायकवाड, डॉ. सूर्यकांत राठोड, डॉ. ए. एस. पदमपल्ले, डॉ. ए. एस. आष्टे, डॉ. एस. एस. रेवते, डॉ. व्ही. एन. हिस्सल, डॉ. एस. एम. सुरवसे, एस. पी. पसरकल्ले, डॉ. डी. एस. इटले, डॉ. दामू बिराजदार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. जाधव, प्रा. चव्हाण आदी उपस्थित होते.

## चौका येथे दुष्काळ व पाणी परिषद; आसूड कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. रामचंद्र झाडे



**चौका, जि. छत्रपती संभाजीनगर :** रविवार दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता चौका येथे दुष्काळ व पाणी परिषद - चौका २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन ज्येष्ठ शेतकरी महिला यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी होणाऱ्या आसूड कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक डॉ. रामचंद्र झाडे यांची निवड करण्यात आली आहे. हे कविसंमेलन शेतकऱ्यांच्या दुःखांना वाचा फोडणारे, तिफण कविता दरबार उपक्रमांतर्गत होणार आहे.डॉ. झाडे हे प्रसिद्ध कवी असून कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. या संमेलनात शेती, पाणी, दुस्काळ आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील कविता सादर होणार आहे. कवी विजयकुमार पांचाळ, अशोक शेवगण, संजय शिंदे, संजय गायकवाड, सागर कोलते, वृषाली सोनवणे, उज्वला कोंडके हे कवी, कवयित्री सहभागी होणार आहेत.सोबतच संत भ ।गवान बाबा कला मंचाचा समाज प्रबोधनपर व क्रांतिकारी गीतांचा कार्यक्रम होईल. यात रामभाऊ डोंगरे, दगडू भाऊ वाघ, आदी सहभागी होणार आहे.या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती, शिवार संसद महाराष्ट्र, त्रैमासिक तिफण, संत भगवान बाबा कला मंच, चौका ग्रामस्थ आणि संयोजक: डॉ. शिवाजी हुसे. दगडू भाऊ वाघ, संतोष वाघ, रामभाऊ डोंगरे, अमोल वाघ, शंकर बोंगाणे, राजू वाघ, आजिनाथ वाघ आदिंनी केले आहे

## राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती श्रमजीवीमध्ये उत्साहात साजरी




**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** उमरगा येथील श्रमजीवी अध्यापक महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय सरपे यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ. विजय सरपे यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांना उजाळा देताना विद्यार्थ्यांना सत्य, अहिंसा, शिस्त, स्वावलंबन, साधेपणा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्यासाठी नसून, स्वतःचा तसेच समाजाचा विकास करण्यासाठी असावे आणि विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रगतीसाठी जबाबदार, संवेदनशील व चारित्र्यसंपन्न नागरिक बनावे, असे त्यांनी सांगितले.तसेच माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचा संदर्भ देत त्यांनी विद्यार्थ्यांना देशाच्या भविष्याची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. शिक्षणासोबत शिस्त, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा व साधेपणा अंगीकारावा. मेहनतीला पर्याय नाही. स्वतःच्या प्रगतीसोबतच देशाच्या प्रगतीतही योगदान द्यावे आणि देशसेवा, स्वावलंबन व जबाबदारीची भावना मनात रुजवावी, असे त्यांनी नमूद केले.“जय जवान, जय किसान” हा शास्त्रीजींचा संदेश आजही देशातील प्रत्येक नागरिकाला प्रेरणा देणारा असल्याचेही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास प्रा. पवार भाऊ, प्रा. चव्हाण देविदास, प्रा. करंडे तेजस्विनी, श्री. सुरवसे दगडू तसेच प्रथम व द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तिसगाव आश्रमशाळेत गांधी-शास्त्री जयंती उत्साहात



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तिसगाव येथे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती अतिशय उत्साहाने साजरी करण्यात आली व त्यानिमित्त आदिवासी विकास विभागाने सुंदर स्वच्छ व निरोगी आश्रम शाळा अभियानास आज पासून सुरुवात केली आहे विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व या अभियानातून त्यांच्यात रुजावे हा उद्देश समोर ठेवून शासनाने या अभियानाची सुरुवात महात्मा गांधी जी यांच्या जयंतीनिमित्त सुरुवात केली कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री परदेशी सर, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक डीजी खालापुरे सर,जेष्ठ प्राथमिक शिक्षक श्री बी आर भावसार सर, पुरुष अधीक्षक कांगणे सर, स्त्री अधीक्षिका श्रीमती गोळेगावकर मॅडम,प्राथमिक शिक्षिका नफिसा बानो सय्यद मॅडम, नर्स रेखा लोखंडे मॅडम क्रीडा शिक्षक सागर मुगले सर, वैभव खिल्लारे नारायण करपे आणि पवन करपे,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एस पी मधे सर यांनी केले या ठिकाणी सर्व शिक्षक व अध्यक्षीय भाषणामध्ये श्री डी डी परदेशी सर यांनी विद्यार्थ्यांना सत्य अहिंसा प्रेम या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले आणि कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती गोळेगावकर मॅडम यांनी केले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# श्रीकृष्ण महाविद्यालयात गांधी आणि शास्त्री जयंती साजरी




**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे)** :गेल्या सहस्त्रकातील महानायक म्हणून महात्मा गांधींची जगातील नामांकित विद्वानांनी नोंद घेतली असून महात्मा गांधींचा विचार न संपणारा आणि चिरंतन स्वरूपाचा आहे,जोपर्यंत मानवी जीवन आहे तोपर्यंत गांधींचा विचार हा नेहमीच ऊर्जाकेंद्र म्हणून प्रेरणा देणारा आहे.महात्मा गांधी यांच्याविषयी भारतीय जनमानसात अनेक गैरसमज असून जागतिक पातळीवर जो न्याय महात्मा गांधी यांना मिळाला,तो आपण त्यांना त्यांच्या हयातीत देऊ शकलो नाही हे वास्तव आहे.असहकार आणि अहिंसेच्या तत्वांवर त्यांनी आपल्या आंदोलनाची पायाभरणी केली.गरिबी निर्मूलन,आर्थिक स्वावलंबन,स्त्रियांचे समान हक्क,सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण,आणि सर्वात महत्वाचे म्हणजे स्वातंत्र्य यासाठी देशभरात तीव्र चळवळ उभी केली.महात्मा गांधींनी आत्मशुद्धीसाठी आणि राजकीय चळवळीसाठी साधन म्हणून प्रदीर्घ उपवास केले,महात्मा गांधी हे नेहमीच संप्रदायिकतेचे विरोधक होते.त्यामुळे साहजिकच ते सर्व जाती ,धर्म आणि पंथ यांच्यातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचले.गांधीविचार हा जगण्याचा विचार होता.त्याचे विचार किंवा गांधीविचार हा तत्त्वज्ञानाचा विषय नसून तो आचरणाचा विषय आहे.तालुक्यातील गुंजोटी येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित श्रीकृष्ण महाविद्यालयात महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात डॉ.राजाराम निगडे हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे होते.श्रीकृष्ण वरिष्ठ महाविद्यालयात महात्मा गांधी आणि पूर्वप्रधानमंत्री लालबहादुर शास्त्री यांची जयंती स्वच्छता हीच सेवा या प्राधान्यक्रमाने मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनुक्रमे महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेला प्रमुख पाहुणे डॉ. राजाराम निगडे,अध्यक्ष प्राचार्य डॉ.गुलाब राठोड,उपस्थित प्रा.डॉ.महादेव खोत,प्रा.डॉ. मल्लमा आंबुसे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अनुक्रमे महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.यावेळी प्राध्यापक , प्राध्यापकेतर सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# पाणीपुरवठा योजनेला गती; सुनिता पावशेरे यांचे उपोषण स्थगित



**उमरगा/लोहारा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील कलदेव निंबाळा व १५ गावांच्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचे काम लवकरात लवकर पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्याच्या मागणीसाठी ग्रामपंचायत गटनेत्या तथा राष्ट्रवादी महिला जिल्हा उपाध्यक्ष सुनिता देविदास पावशेरे यांनी २ ऑक्टोबर, महात्मा गांधी जयंतीपासून उपोषण करण्याचा इशारा दिला होता. मात्र, प्रशासनाकडून योजनेच्या कामाला गती देण्यात आल्याने हे उपोषण तूर्तास स्थगित करण्यात आले आहे.योजनेच्या अंमलबजावणीसाठी पावशेरे यांनी यापूर्वी विविध स्तरांवर पाठपुरावा केला होता. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त धाराशिव येथे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन महिला, नागरिक व पदाधिकाऱ्यांसह उपोषण करण्याचे निवेदन देण्यात आले होते.या मागणीची दखल घेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता ए. ए. गुरव, शाखा अभियंता हेमंत विधाते तसेच संबंधित ठेकेदाराचे अभियंता सतीश कराळे यांनी कलदेव निंबाळा येथे सुनिता पावशेरे यांची भेट घेतली. यावेळी योजनेचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्याबाबत लेखी आश्वासन देण्यात आले. तसेच उपोषण स्थगित करण्याची विनंती करणारे पत्रही देण्यात आले.योजनेच्या कामातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या विद्युत जनित्रासाठी आवश्यक विद्युत डेपो बसविण्याचे तसेच विद्युत जोडणीचे काम लवकर पूर्ण करून योजना कार्यान्वित करण्यात येईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सध्या योजनेचे काम वेगाने सुरू असून, उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून कार्यवाही सुरू आहे.दरम्यान, या योजनेशी संबंधित जवळपास सर्वच गावांनी आपापली जुनी विद्युत थकबाकी भरली आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा अडथळा दूर झाला असून, आता पाणीपुरवठा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे सांगण्यात आले.प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद आणि प्रत्यक्ष कामाला मिळालेली गती लक्षात घेऊन २ ऑक्टोबरपासून करण्यात येणारे उपोषण तूर्तास स्थगित करण्यात येत असल्याचे ग्रामपंचायत गटनेत्या सुनिता पावशेरे यांनी सांगितले.यावेळी सुनिता पावशेरे म्हणाल्या, "दुष्काळी गावांतील नागरिकांना लवकरात लवकर पाणी मिळणे हाच आमचा प्रमुख उद्देश आहे. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानुसार उर्वरित काम तातडीने पूर्ण करून योजना सुरू करावी, ही अपेक्षा आहे. योजनेला सहकार्य करणारे सर्वच पदाधिकारी, अधिकारी आणि संबंधित ठेकेदार यांचे आम्ही आभार मानतो."

# नळदुर्ग येथे संत निरंकारी सेवादल प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न; दशकपूर्ती सोहळा व बॅगांचे वाटप



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून नळदुर्ग व मुरूम ब्रँचच्या संयुक्त विद्यमाने नळदुर्ग, ता. तुळजापूर येथील अंबाबाई मंदिराच्या सभागृहात संत निरंकारी सेवादल प्रशिक्षण शिबिर शुक्रवारी (ता. २) रोजी उत्साहात पार पडले. या शिबिरात संत निरंकारी मिशनच्या शिकवणीनुसार शिस्त, सेवा आणि सहकार्याचे धडे देण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूरचे क्षेत्रीय संचालक बाळासाहेब पवार हे होते. यावेळी वस्त्र मंत्रालयातील सेवानिवृत्त प्रादेशिक व्यवस्थापक डॉ. शिवाजी शिंदे, मुरूम रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, येळीचे प्रबंधक हरिकिशन पवार, सामाजिक कार्यकर्ते धनराज शिंदे, बलसूरचे प्रबंधक युवराज बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.या विशेष सोहळ्यात मुरूम ब्रँचला १० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल 'दशकपूर्ती सोहळा' उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच, मुरूमच्या मीरा मोटे व सेवादल सार्थक बोडरे यांचा वाढदिवस यावेळी केक कापून व सत्कार करून साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त मीरा मोटे यांनी मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्या. दिवंगत सिद्राम गंगाराम शिंदे यांच्या स्मरणार्थ शिंदे परिवाराकडूनकार्यक्रमादरम्यान संत निरंकारी सेवादलाच्या माता-बहिनजींना मान्यवरांच्या हस्ते उपयोगी बॅगांचे वाटप करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या प्रशिक्षणात क्षेत्रीय संचालक बाळासाहेब पवार यांनी संत निरंकारी मिशनचे नियम, व्यवस्थापन, नियोजन, शिस्त, अटी आणि निस्वार्थी सेवेबद्दल सेवादल महापुरुष व बहिनजींना सखोल मार्गदर्शन केले. नळदुर्गचे सेवादल इन्चार्ज रोहित विभुते, मुरूमचे सेवादल इन्चार्ज बिरू बंदीछोडे, अभिजीत रुपनर, अभिषेक चव्हाण, वासू पवार, शिवानंद बिराजदार, दत्तात्रेय बोडरे, प्रमोद नारायणकर, ज्ञानेश्वर काळे, सुरेखा कांबळे, उषा साखरे, कमल शेवाळे, सुनीता व्हटकर, अनुसया नारायणकर, वैभव कटके आदींनी पुढाकार घेतला. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संत निरंकारी मिशनच्या मानवतावादी विचारांचा व सेवादलाच्या कार्याचा बाळासाहेब पवार, डॉ. शिवाजीराव शिंदे, डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वाढदिवसानिमित्त मीरा मोटे यांनी मनोगतातून भावना व्यक्त केल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरूम ब्रँचचे मुखी दयानंद साखरे तर आभार नळदुर्ग ब्रँचचे मुखी सुनील पिसके यांनी मानले. या शिबिराला शेकडो सेवादल महापुरुष व बहिनजी उपस्थित होत्या.


## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ ऑक्टोबर २०२६

# पाली आणि मराठी : अभिजाततेतून ज्ञानपरंपरेचा गौरव- डॉ. राजेंद्र बगाटे

भाषा ही केवळ विचारांची देवाणघेवाण करणारे साधन नसते; ती एखाद्या समाजाच्या स्मृती, संस्कृती, ज्ञान, तत्त्वचिंतन, मूल्यव्यवस्था आणि जीवनानुभवांचे जतन करणारी सजीव परंपरा असते. म्हणूनच एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे म्हणजे तिच्या प्राचीनतेबरोबरच तिच्या साहित्यिक आणि बौद्धिक योगदानाची अधिकृत दखल होय. प्राचीन बौद्ध ग्रंथपरंपरेच्या कालदृष्ट्या आधीच्या साहित्यिक वारशामुळे पालीचा प्रथम उल्लेख करता येतो; त्यानंतर प्रदीर्घ ऐतिहासिक आणि साहित्यिक परंपरा लाभलेल्या मराठीचा विचार करावा लागतो. मात्र पाली आणि मराठी यांपैकी कोणती भाषा 'अधिक अभिजात' आहे, असा कोणताही अधिकृत क्रम भारत सरकारने निश्चित केलेला नाही. दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने पाली, मराठीसह प्राकृत, आसामी आणि बंगाली या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मान्यता दिली आणि भारतातील अभिजात भाषांची संख्या अकरा झाली. त्यामुळे ३ ऑक्टोबर हा मराठीच्या अभिजाततेचा अधिकृत गौरवदिन असताना, पालीच्या अभिजात दर्जाच्या पार्श्वभूमीवर भारतीय ज्ञानपरंपरेच्या व्यापक वारशाचा विचार करण्याचाही महत्त्वाचा दिवस ठरतो.अभिजात भाषा ही संकल्पना केवळ 'जुनी भाषा' एवढ्यापुरती मर्यादित नाही. प्राचीन ग्रंथ किंवा नोंदविलेला इतिहास, दीर्घकाळ टिकून राहिलेली साहित्यपरंपरा, पिढ्यानुपिढ्या मौल्यवान मानले गेलेले साहित्य, ज्ञानपरंपरेशी असलेले नाते, गद्य-पद्य साहित्याबरोबरच शिलालेख आणि अभिलेखीय पुरावे अशा विविध निकषांचा विचार अभिजात दर्जासाठी केला जातो. २०२४ मध्ये सुधारित निकषांच्या आधारे भाषिक तज्ज्ञ समितीने पाली आणि मराठीसह पाच भाषांना हे निकष पूर्ण करणाऱ्या भाषा म्हणून शिफारस केली. त्यामुळे अभिजाततेचा अर्थ एखाद्या भाषेला दुसऱ्या भाषेपेक्षा श्रेष्ठ ठरविणे नसून तिच्या स्वतंत्र ऐतिहासिक आणि सांस्कृतिक योगदानाची दखल घेणे हा आहे.पालीचे महत्त्व भारतीय बौद्धिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत मोठे आहे. बौद्ध साहित्याच्या विशाल परंपरेशी पालीचा घनिष्ठ संबंध आहे. त्रिपिटक आणि त्यासंबंधित ग्रंथांमधून तत्कालीन भारतीय समाजजीवन, नैतिक विचार, मानवी आचरण, तत्त्वचिंतन आणि सामाजिक संबंधांचे अनेक पैलू समोर येतात. विनयपिटक, सुत्तपिटक आणि अभिधम्मपरंपरेमधील साहित्य भारतीय विचारविश्वाच्या इतिहासाचा महत्त्वाचा स्रोत मानले जाते. पालीचा अभ्यास त्यामुळे केवळ भाषाशास्त्राचा विषय राहत नाही; तो इतिहास, तत्त्वज्ञान, समाजविचार, धर्मविचार, संस्कृती आणि मानवाच्या नैतिक चिंतनाच्या अभ्यासाशी जोडला जातो. भारत सरकारच्या माहितीनुसार प्राचीन भारताच्या इतिहासाची पुनर्रचना करण्यासाठी पाली साहित्य महत्त्वाचे आहे, कारण त्यामध्ये भूतकाळावर प्रकाश टाकणारी मौल्यवान सामग्री आढळते. पालीचे वैशिष्ट्य तिच्या व्यापक सांस्कृतिक प्रभावातही दिसते. बौद्ध विचारांच्या प्रसाराबरोबर पाली साहित्यपरंपरा भारताबाहेरील अनेक प्रदेशांपर्यंत पोहोचली. श्रीलंका, म्यानमार आणि थायलंड यांसह विविध बौद्ध सांस्कृतिक प्रदेशांमध्ये पालीचा अभ्यास आजही केला जातो. पाली ग्रंथपरंपरेने भारतीय ज्ञान, नैतिक चिंतन आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा आशियातील विविध समाजांशी संवाद घडवून आणला. त्यामुळे पालीचा वारसा हा केवळ एका प्रदेशाचा किंवा एका समुदायाचा वारसा न राहता भारतातून विस्तारित झालेल्या व्यापक बौद्धिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचा भाग बनतो. पालीच्या अभिजाततेचा विचार करताना एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. आज आपण 'पाली' या नावाने ज्या भाषिक परंपरेचा उल्लेख करतो, तिचा विकास आणि ग्रंथपरंपरा अनेक ऐतिहासिक प्रक्रियांमधून घडली आहे. त्यामुळे तिच्या इतिहासाचा अभ्यास करताना साधी आणि एकरेषीय मांडणी करण्याऐवजी उपलब्ध ग्रंथ, भाषिक पुरावे, हस्तलिखिते आणि ऐतिहासिक संदर्भ यांच्या चिकित्सक अभ्यासाची आवश्यकता आहे. अभिजात दर्जामुळे अशा संशोधनाला अधिक चालना मिळणे अपेक्षित आहे. प्राचीन ग्रंथांचे संपादन, विविध हस्तलिखितांची तुलना, भाषांतर आणि डिजिटल जतन यांमुळे पालीच्या ज्ञानपरंपरेचा अधिक व्यापक परिचय समाजाला होऊ शकतो.मराठीची अभिजात परंपरा देखील तितकीच समृद्ध आणि प्रदीर्घ आहे. भारत सरकारच्या माहितीनुसार मराठीच्या भाषिक मुळांचा मागोवा अडीच हजार वर्षांहून अधिक मागे घेता येतो. प्राचीन महारठी, मरहट्टी, महाराष्ट्री प्राकृत आणि अपभ्रंश मराठी अशा विविध भाषिक अवस्थांमधून तिचा विकास होत आधुनिक मराठीपर्यंत पोहोचला. या प्रदीर्घ प्रवासात मराठीने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परिवर्तनांचा स्वीकार केला. त्यामुळे मराठीचा अभिजात दर्जा हा केवळ आधुनिक मराठी भाषिक समाजाच्या भावनेचा विषय नसून तिच्या प्रदीर्घ भाषिक उत्क्रांतीची आणि साहित्यिक परंपरेची अधिकृत मान्यता आहे. मराठीच्या अभिजाततेचे खरे सामर्थ्य तिच्या साहित्यपरंपरेत प्रकर्षाने दिसते. संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', संत नामदेवांचे अभंग, संत एकनाथांचे साहित्य आणि संत तुकारामांची अभंगगाथा यांनी मराठीला व्यापक वैचारिक आणि सामाजिक आशय दिला. या साहित्याने सामान्य माणसाच्या जीवनाशी संवाद साधला. ओवी, अभंग, भारूड, पोवाडा, लावणी, लोककथा आणि लोकगीतांच्या माध्यमातून मराठी लोकजीवनाच्या विविध स्तरांमध्ये रुजली. पुढे आधुनिक काळात कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, पत्रकारिता, वैचारिक लेखन आणि संशोधन यांच्या माध्यमातून मराठीने आधुनिक समाजातील बदल, संघर्ष, प्रश्न आणि आकांक्षा यांना अभिव्यक्ती दिली. त्यामुळे मराठीची अभिजातता केवळ प्राचीनतेत नसून सतत विकसित होत राहिलेल्या साहित्यिक आणि सामाजिक अभिव्यक्तीतही आहे. पाली आणि मराठी यांची ऐतिहासिक वाटचाल वेगवेगळी असली तरी ज्ञानसंवर्धन हा दोन्ही भाषांमधील महत्त्वाचा समान धागा आहे. पालीने बौद्ध तत्त्वज्ञान, नैतिक विचार आणि प्राचीन भारतीय समाजजीवनाशी संबंधित साहित्याचे जतन केले, तर मराठीने महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाला व्यापक अभिव्यक्ती दिली. पालीतील ग्रंथपरंपरा आणि मराठीतील संतसाहित्य या दोन्हींकडे केवळ धार्मिक किंवा साहित्यिक वारसा म्हणून पाहणे अपुरे ठरेल. त्यामध्ये मानवी जीवन, सामाजिक संबंध, नैतिकता, दुःख, श्रम, समाजव्यवस्था आणि परिवर्तन यांविषयीचे विविध विचार दडलेले आहेत. या दोन्ही भाषांचा समाजशास्त्रीय, ऐतिहासिक आणि तुलनात्मक अभ्यास भारतीय समाज समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतो.अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे या भाषांतील प्राचीन ज्ञानसंपदेचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करणे. अनेक मौल्यवान ग्रंथ, हस्तलिखिते आणि भाषिक पुरावे अद्याप संशोधनाच्या व्यापक प्रवाहात आलेले नाहीत. त्यांचे दस्तऐवजीकरण, जतन, चिकित्सक संपादन आणि भाषांतर करणे आवश्यक आहे. पाली आणि मराठीतील प्राचीन साहित्य अन्य भारतीय तसेच परदेशी भाषांमध्ये उपलब्ध झाले, तर त्यांचा अभ्यास अधिक व्यापक पातळीवर होऊ शकतो. अभिजाततेचा लाभ विद्यापीठे, संशोधक, विद्यार्थी आणि सामान्य वाचक यांच्यापर्यंत पोहोचणे ही या प्रक्रियेची खरी कसोटी आहे. आजच्या डिजिटल युगात भाषासंवर्धनाच्या नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. दुर्मीळ हस्तलिखितांचे संगणकीकरण, प्राचीन ग्रंथांचे डिजिटल संग्रह, इलेक्ट्रॉनिक शब्दकोश, ध्वनिसंग्रह, ऑनलाइन ग्रंथालये आणि शोधसुलभ माहितीभांडारे यांमुळे पाली आणि मराठीचा वारसा जगभर पोहोचविता येऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय भाषाविज्ञान आणि आधुनिक भाषांतर तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्राचीन ग्रंथांच्या अभ्यासासाठी नवी साधने विकसित करता येतील. मात्र तंत्रज्ञानाच्या वापरासोबत ग्रंथाची शुद्धता, ऐतिहासिक संदर्भ आणि शास्त्रीय प्रामाणिकता जपणे अत्यावश्यक आहे. मराठीला मिळालेल्या अभिजात दर्जाचा उपयोग आधुनिक ज्ञानभाषा म्हणून तिची क्षमता वाढविण्यासाठी केला पाहिजे. विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक, कायदा, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शिक्षण आणि व्यवस्थापन अशा विविध ज्ञानशाखांमधील दर्जेदार साहित्य मराठीत उपलब्ध होणे गरजेचे आहे. मराठीतील उच्च शिक्षण आणि संशोधनासाठी संदर्भग्रंथ, शब्दसंपदा आणि परिभाषा समृद्ध झाली पाहिजे. भाषा अभिजात आहे असे सांगण्यापेक्षा त्या भाषेत आधुनिक ज्ञान निर्माण होत आहे का, नवीन पिढी ती ज्ञानभाषा म्हणून स्वीकारत आहे का आणि तिच्यामध्ये संशोधनाची क्षमता वाढत आहे का, हे अधिक महत्त्वाचे ठरते. पालीच्या बाबतीतही आधुनिक संशोधनाशी जोडलेले नवे प्रयत्न आवश्यक आहेत. पालीचा अभ्यास बौद्ध साहित्यापुरता मर्यादित न ठेवता इतिहास, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, पुरातत्त्व, तुलनात्मक साहित्य आणि सांस्कृतिक अभ्यास यांच्याशी जोडला पाहिजे. पाली ग्रंथांमधील सामाजिक संस्था, नैतिक मूल्ये, मानवी संबंध आणि तत्कालीन जीवनपद्धतींचा चिकित्सक अभ्यास केल्यास भारतीय समाजाच्या प्राचीन इतिहासाचे अनेक पैलू स्पष्ट होऊ शकतात. त्यामुळे पालीचे संवर्धन म्हणजे केवळ एका प्राचीन भाषेचे संरक्षण नव्हे, तर भारतीय बौद्धिक इतिहासाच्या महत्त्वपूर्ण स्रोतांचे जतन होय.शिक्षणसंस्थांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना अभिजात भाषांची माहिती केवळ पाठ्यपुस्तकातील विषय म्हणून न देता त्यांच्या मागील इतिहास, साहित्य आणि ज्ञानपरंपरेशी जोडणे आवश्यक आहे. ग्रंथवाचन, हस्तलिखितांचा परिचय, भाषांतर, संशोधनपर प्रकल्प, चर्चासत्रे आणि डिजिटल साधनांचा वापर यांना प्रोत्साहन दिल्यास अभिजात भाषांबद्दलची जिज्ञासा वाढू शकते. प्राचीन भाषेचा अभ्यास हा भूतकाळात अडकण्याचा मार्ग नसून वर्तमान समजून घेण्याचे आणि भविष्य घडविण्याचे साधन आहे, ही भूमिका नव्या पिढीमध्ये निर्माण झाली पाहिजे. महाराष्ट्र शासनाने ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा दिवस' आणि ३ ते ९ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे मराठीच्या सुमारे अडीच हजार वर्षांच्या परंपरेचे भान, तिच्या वैभवाचे संवर्धन, जनजागृती आणि संशोधनाला चालना देण्याची भूमिका आहे. त्यामुळे या दिवसाचे कार्यक्रम केवळ औपचारिक भाषणे आणि गौरवपर समारंभांपुरते मर्यादित न राहता वाचन, संशोधन, ग्रंथप्रदर्शने, भाषांतर, हस्तलिखित संवर्धन आणि विद्यार्थ्यांचा सहभाग यांवर आधारित असणे अधिक उपयुक्त ठरेल. पाली आणि मराठीचा गौरव करताना भारताच्या बहुभाषिक स्वरूपाचे भान ठेवणेही आवश्यक आहे. अभिजात भाषांचा दर्जा हा इतर भारतीय भाषा किंवा बोलींचे महत्त्व कमी करणारा नाही. उलट, भारतातील विविध भाषिक परंपरांचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभव अधोरेखित करणारी ही प्रक्रिया आहे. विविध भाषांमधील अनुवाद आणि ज्ञानाची देवाणघेवाण वाढल्यास भारतीय भाषिक संस्कृती अधिक समृद्ध होईल. पाली आणि मराठी या दोन्ही भाषा परस्पर स्पर्धेच्या नव्हे, तर भारतीय ज्ञानपरंपरेतील विविध प्रवाहांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भाषा म्हणून समजून घेणे आवश्यक आहे.३ ऑक्टोबरचा हा गौरवदिन म्हणूनच केवळ एका भाषेचा उत्सव नाही. पालीच्या प्राचीन ज्ञानपरंपरेपासून मराठीच्या प्रदीर्घ साहित्यिक प्रवासापर्यंत भारतीय समाजाने निर्माण केलेल्या बौद्धिक संपदेचे स्मरण करण्याचा हा प्रसंग आहे. अभिजाततेचा खरा अर्थ भूतकाळाचा केवळ गौरव करणे नसून त्या वारशाला वर्तमानाशी जोडणे आणि भविष्यासाठी अधिक सक्षम करणे हा आहे. पालीतील ज्ञानसंपदा आणि मराठीतील साहित्यपरंपरा संशोधन, शिक्षण, तंत्रज्ञान आणि सामाजिक प्रबोधनाशी जोडली गेली, तर अभिजाततेची मान्यता अधिक अर्थपूर्ण ठरेल. पाली आणि मराठी या दोन्ही भाषांची अभिजातता श्रेष्ठ-कनिष्ठतेत नव्हे, तर त्यांच्या स्वतंत्र ऐतिहासिक योगदानात आहे; एका भाषेने प्राचीन बौद्ध ज्ञानपरंपरेचे महत्त्वपूर्ण जतन केले, तर दुसरीने प्रदीर्घ सामाजिक-सांस्कृतिक अनुभवांना साहित्यिक अभिव्यक्ती दिली. या दोन्ही वारशांचा आधुनिक ज्ञाननिर्मितीशी सर्जनशील संवाद घडविणे, हीच अभिजात भाषा गौरवदिनाची खरी सार्थकता आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, मराठी, पाली व समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ ऑक्टोबर २०२६


## महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर : दोन विचारधारा, एक अस्वस्थ भारत

महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर : दोन विचारधारा, एक अस्वस्थ भारत2ऑक्टोबर महात्मा गांधी यांची जयंती या निमित्त महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या वेगवेगळया विचारप्रवाह वर मत व्यक्त करणे मला महत्वाचे वाटले. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही दोन अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्वे आहेत. दोघांच्या कार्यक्षेत्रात आणि विचारपद्धतीत मोठे अंतर होते; तरीही भारतीय समाजातील अन्याय, विषमता आणि माणसाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न त्यांच्या चिंतनाच्या केंद्रस्थानी होता.एकाने सत्याग्रह, अहिंसा आणि नैतिक परिवर्तनाचा मार्ग स्वीकारला; दुसऱ्याने शिक्षण, कायदा, राजकीय प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्यायाचा. त्यामुळे त्यांच्यातील मतभेद हे केवळ दोन व्यक्तींचे मतभेद नव्हते. ते भारतीय समाजाच्या पुनर्रचनेबद्दलच्या दोन भिन्न दृष्टिकोनांचे प्रतिनिधित्व करत होते.परिवर्तन कुठून सुरू व्हावे? गांधीजींचा विश्वास समाजाच्या अंतःकरणातील परिवर्तनावर होता. अन्याय करणाऱ्या माणसाचे मन बदलले, तर समाजही बदलू शकतो, असे त्यांच्या विचारातून दिसते.बाबासाहेब आंबेडकरांचा अनुभव त्यांना वेगळ्या निष्कर्षापर्यंत घेऊन गेला. शतकानुशतके जात, अस्पृश्यता आणि सामाजिक बहिष्कार टिकून राहिला असेल, तर केवळ सद्सद्विवेकबुद्धीला आवाहन पुरेसे नाही. अन्याय निर्माण करणाऱ्या संस्थात्मक रचनेत बदल घडवावा लागेल.म्हणून महात्मा गांधीजींचा आग्रह होता—माणसाचे मन बदला.बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता—माणसाला अन्यायाच्या व्यवस्थेतून मुक्त करा.याच फरकातून पुढे यांच्यात अनेक मतभेद आकाराला आले.अस्पृश्यता : दयेचा प्रश्न नव्हे, अधिकारांचा प्रश्नमहात्मा गांधीजींनी अस्पृश्यतेविरुद्ध व्यापक सामाजिक आणि नैतिक आंदोलन उभे केले. त्यांनी तिला हिंदू समाजावरील कलंक मानले आणि सामाजिक समतेसाठी जनजागृती केली.बाबासाहेब आंबेडकरांना मात्र दलित समाजाकडे पाहण्याची ही चौकट अपुरी वाटत होती. त्यांच्या मते दलितांना सहानुभूतीची नव्हे, तर समान नागरिक म्हणून अधिकारांची गरज होती.दया देणाऱ्याच्या हातात असते; तर अधिकार कायद्याने सुरक्षित केले जातात.हीच बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेची धार होती.त्यामुळे अस्पृश्यतेविरोधातील महात्मा गांधींचा नैतिक आग्रह आणि बाबासाहेब आंबेडकरांचा अधिकारकेंद्री संघर्ष यांच्यात मूलभूत फरक राहिला.वर्णव्यवस्थेचा प्रश्नगांधीजींनी जन्माधिष्ठित अस्पृश्यतेचा विरोध केला; मात्र त्यांच्या विचारांत वर्णव्यवस्थेच्या काही संकल्पनांना विशिष्ट काळात वेगळे स्थान होते. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र जात आणि वर्णव्यवस्थेच्या मूलभूत रचनेवरच प्रश्न उपस्थित केला.त्यांच्यासाठी जात म्हणजे केवळ सामाजिक ओळख नव्हती. ती जन्माच्या आधारावर माणसाला उच्च-नीच ठरवणारी व्यवस्था होती.म्हणून जातिनिर्मूलन हा त्यांच्या दृष्टीने सुधारणा नव्हे, तर मानवी स्वातंत्र्याचा प्रश्न होता.त्यांचा मूलभूत आग्रह स्पष्ट होता—जन्म माणसाचे भविष्य ठरवणारा घटक असू नये.,स्वतंत्र मतदारसंघ आणि पुणे करारगांधी-आंबेडकर मतभेदांचा सर्वाधिक तीव्र राजकीय टप्पा दलितांच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या प्रश्नावर आला.१९३२ च्या कम्युनल अवॉर्डने Depressed Classes साठी स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद केली. आंबेडकरांना यात दलितांना स्वतंत्र राजकीय आवाज मिळण्याची शक्यता दिसत होती. गांधीजींनी याला विरोध केला आणि येरवडा कारागृहात उपोषण सुरू केले.या संघर्षातून पुणे करार झाला. स्वतंत्र मतदारसंघाऐवजी संयुक्त मतदारसंघ कायम राहिला; मात्र अनुसूचित जातींसाठी राखीव जागांची संख्या वाढवण्यात आली.या प्रसंगाचा अर्थ “कोण जिंकले?” एवढ्यावर थांबत नाही.गांधीजींसाठी हिंदू समाजाची राजकीय एकता महत्त्वाची होती; आंबेडकरांसाठी वंचित समाजाचे स्वतंत्र प्रतिनिधित्व आणि राजकीय सामर्थ्य.या दोन चिंतांमधील ताण भारतीय लोकशाहीच्या पुढील प्रवासातही दिसत राहिला.ग्रामस्वराज्य आणि आधुनिकतेचा प्रश्नगांधीजींच्या स्वराज्याच्या कल्पनेत गाव, स्वावलंबन, ग्रामोद्योग आणि विकेंद्रित अर्थव्यवस्थेला महत्त्व होते.आंबेडकरांनी मात्र भारतीय गावाकडे जातीय सत्तासंबंधांच्या अनुभवातून पाहिले. गाव हे आत्मनिर्भरतेचे केंद्र असू शकते, पण त्याच वेळी सामाजिक बहिष्काराचेही केंद्र ठरू शकते, हा त्यांचा अनुभव होता.म्हणून शिक्षण, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि आधुनिक संस्थांना त्यांनी सामाजिक गतिशीलतेची साधने मानले.हा केवळ अर्थव्यवस्थेचा मतभेद नव्हता. प्रश्न होता—परंपरेत राहून समाज बदलायचा की परंपरेच्या बंधनांपासून मुक्त होऊन?धर्म आणि सामाजिक समतागांधीजींच्या सार्वजनिक जीवनात धर्माला नैतिकतेशी जोडलेले स्थान होते. सत्य, अहिंसा आणि आत्मशुद्धी हे त्यांच्या धार्मिक चिंतनाचे महत्त्वाचे आधार होते.आंबेडकरांसाठी धर्माची कसोटी वेगळी होती. धर्माने माणसामाणसांत समता, बंधुता आणि प्रतिष्ठा निर्माण केली पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती.जातिव्यवस्थेशी त्यांचा संघर्ष अखेर हिंदू धर्माच्या चौकटीबाहेर जाण्यापर्यंत पोहोचला. १९५६ मध्ये त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला.हा निर्णय त्यांच्या दीर्घ सामाजिक संघर्षाचा परिपाक होता.सामाजिक लोकशाहीची गरजगांधीजींसाठी स्वराज्य म्हणजे केवळ ब्रिटिश सत्ता संपवणे नव्हते. ते व्यक्ती आणि समाजाच्या नैतिक स्वातंत्र्याशी जोडलेले होते.आंबेडकरांनी या स्वातंत्र्याला आणखी एक कठोर प्रश्न जोडला—राजकीय स्वातंत्र्य मिळाले, पण समाजात माणूस समान नसेल तर त्या स्वातंत्र्याचे मूल्य काय?म्हणून त्यांच्या विचारात लोकशाही केवळ मतदानपेटीत नव्हती. ती सामाजिक संबंधांतही दिसली पाहिजे.स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये त्यांच्या सामाजिक लोकशाहीची पायाभरणी होती.मतभेदांचा खरा अर्थगांधी आणि आंबेडकरांना एकमेकांच्या विरोधात उभे करणे सोपे आहे; पण इतिहास तितका सोपा नाही.गांधीजींचा भर नैतिक परिवर्तनावर होता; आंबेडकरांचा संस्थात्मक आणि सामाजिक परिवर्तनावर.गांधीजी समाजाच्या अंतःकरणाला आवाहन करत होते; आंबेडकर समाजाच्या रचनेला प्रश्न विचारत होते.एकाला माणसाच्या मनातील अन्याय दिसत होता; दुसऱ्याला त्या अन्यायाला टिकवून ठेवणारी व्यवस्था.यामुळे त्यांच्या मतभेदांना केवळ वैयक्तिक संघर्ष मानणे इतिहासाचे अवमूल्यन ठरेल.निष्कर्ष : दोन आवाज, एक अस्वस्थ प्रश्नगांधी आणि आंबेडकर यांच्यातील मतभेदांचा खरा अर्थ त्यांच्या व्यक्तिमत्त्वांच्या संघर्षात नाही; तो भारतीय समाजाच्या आत्मपरीक्षणात आहे.गांधीजींनी समाजाच्या विवेकाला प्रश्न विचारला.आंबेडकरांनी समाजाच्या रचनेलाच प्रश्न विचारला.एकाने म्हटले—अन्यायाविरुद्ध अंतःकरण जागे करा.दुसऱ्याने विचारले—अन्याय निर्माण करणारी व्यवस्था कधी बदलणार?याच दोन प्रश्नांच्या दरम्यान आधुनिक भारताची एक मोठी वैचारिक यात्रा घडते.गांधींचा सत्याग्रह आपल्याला अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची नैतिक शक्ती देतो; आंबेडकरांचा संविधानवाद त्या संघर्षाला अधिकार, समता आणि संस्थात्मक आधार देतो.म्हणून त्यांच्यातील मतभेद मिटवण्याची गरज नाही. उलट, ते समजून घेण्याची गरज आहे.कारण ज्या समाजात प्रश्न विचारणे थांबते, तिथे विचारसरणी धर्म बनते; आणि ज्या समाजात मतभेदांचा संवाद सुरू राहतो, तिथे लोकशाही जिवंत राहते.गांधी आणि आंबेडकर आपल्याला कदाचित एकच उत्तर देत नाहीत.ते आपल्यासमोर दोन वेगवेगळे प्रश्न ठेवतात.“माणसाचे मन किती बदलले?”आणि“माणसाला समान जगण्याची व्यवस्था आपण किती बदलली?”भारतीय लोकशाहीचे खरे मोजमाप कदाचित याच दोन प्रश्नांच्या उत्तरांत दडलेले आहे.आणि म्हणूनच गांधी-आंबेडकरांचा संवाद इतिहासात संपलेला नाही—तो प्रत्येक पिढीने पुन्हा सुरू करायचा आहे.

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**छत्रपती संभाजीनगर**

## धनुर्विद्या हा भारताचा प्राचीन व पारंपरिक खेळ- श्री पुरुषोत्तम बगडिया




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जेईएस महाविद्यालयात "इंडियन राउंड" धनुर्विद्या स्पर्धेचे उद्घाटन जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री पुरुषोत्तम बगडिया यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना श्री बगडिया म्हणाले की, धनुर्विद्या हा भारताचा प्राचीन व पारंपारिक खेळ आहे, भारताच्या धनुरदारींनी जगात नावलौकिक कमवलेला आहे . असेही श्री बगडिया यांनी सांगितलेजालनात जे लईएस महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर भीष्म आर्चरी असोसीएशन जालना आणि जेईएस महाविद्यालय तसेच गुरु द्रोणा आर्चरी अकॅडमी,जालना फर्स्ट व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य वरिष्ठ धनुर्विद्या स्पर्धे चे आयोजन करण्यात आलेले आहे.आज पहिला दिवस होता.इंडियन राउंड राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत १५२ मुले व  ९४ मुली असे एकूण २४६ खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले.स्पर्धेचे उद्घाटन जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री.पुरुषोत्तम बगडिया यांनी केले. व्यासपीठावर ज्यांना एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री. श्रीनिवास भक्कड़,उपाध्यक्ष श्री .फुलचंद भक्कड, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, धनुर्विद्या संघटना जिल्हाध्यक्ष श्री महेश सारस्वत, माजी नगरसेवक श्री.सुनील खरे, धनुर्विद्या संघटनेचे जिल्हा सचिव श्री.प्रकाश दूसेजा, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. हेमंत वर्मा, श्री.सचिन टेकुर, प्रा.डॉ राजेंद्र सोनवणे.प्रा.सुमित अमलेकर, प्रा.विशाल इंगले आदिंची प्रमुख उपस्थिती होती.महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनाचे महासचिव श्री.प्रमोद चांदुरकर व महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रशांत देशपांडे यांचे स्पर्धेसाठी योगदान मिळाले . यावेळी उपप्राचार्य उमेश मोगले, क्रीडा विभाग प्रमुख प्रा.हेमंत वर्मा, प्रा डॉ राजेंद्र सोनवणे, प्रा.किशोर बरकायलू, क्रीड़ा शिक्षक राहुल सारस्वत, प्रा.सचिन निसर्गन यांची उपस्थिति होती.मुलिंच्या गटात अकोला येथील स्पर्धक कु.पूजा राजगुरे ६३० गुण घेऊन राज्यात प्रथम आली. दुसरा क्रमांक कु.सानवी घाडगे ६२८ गुण घेऊन द्वितीय आली.पुणे येथील समृद्धि तायडे, ६२७ गुण घेऊन तिसरी आली. नाशिक ची कु.जिज्ञासा भारंबे ६२३गुण घेऊन चौथा क्रमांक मिळवला.जालनाची कु.आकांक्षा घाडगे हिने ६१५ गुण घेऊन पाचवे स्थान मिळवले.व अमरावती ची कु. श्रावणी पवार हिने ६१५ गुण घेऊन सहावे स्थान पटकावले.वरील पहिल्या चार क्रीड़ापटू यांची निवड पुढे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी झाली आहे.मुलांच्या गटात अमरावती येथील शौर्य चव्हाण ६६४ गुण घेऊन राज्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला.सोलापुर येथील शिवतेज पिंगले ६५० गुण घेऊन द्वितीय येण्याचा बहुमान मिळवला.बुलढाणा येथील राज भारसाखले ६४८ गुण घेऊन तीसरा क्रमांक पटकावला.नंदुरबारचा पवन जाधव ६४२गुण घेऊन चौथे क्रमांक मिळवले.कोल्हापुर चा यश पाटिल ६३६ गुण घेऊन पाचवा आला.तर अमरावती येथील ऋषिकेश चांदुरकर याने ६३५ गुण प्राप्त करुण सहावा येण्याचा बहुमान मिळवला.वरील ६ पैकी ४ स्पर्धकांची निवड राष्ट्रीय स्तरावरील धनुर्विद्या स्पर्धेसाठी झाली आहे.सर्व विजयी खेळाडूंचे प्राचार्य डॉक्टर गणेश अग्निहोत्री तसेच संयोजन समितीने अभिनंदन केलेले आहे.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ ऑक्टोबर २०२६


# मराठी अभिजात भाषा गौरव दिन-वाटचाल आणि सद्यस्थिती

आजचा दिवस मराठी भाषा आणि मराठीवर प्रेम करणा-यांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा ऐतिहासिक क्षण आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरात, सातासमुद्रापार पोहचूनही तिथे मराठी भाषा, सणवार, उत्सव जोपासणा-यांसाठी एक गौरवाचा अभिमानास्पद दिवस आहे. दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस महाराष्ट्र सरकारने 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' अर्थात 'सन्मान दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अधिकृतपणे 'अभिजात भाषा' (क्लॉसिकल लँग्वेज) चा दर्जा जाहीर करण्यात आला. मराठी भाषेला अभिजात दर्जा देताना मराठी भाषेची गेल्या सुमारे २५०० वर्षांची परंपरा गृहीत धरण्यात आली. मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्यासाठी, जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, जनजागृती जास्तीत जास्त व्हावी याकरीता प्रतिवर्षी ३ ऑक्टोबरला 'अभिजात मराठी भाषा दिवस' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मराठी भाषा विभागाने शासन अध्यादेशाद्वारे जारी केले. हा ऐतिहासिक क्षण आणि मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी हा दिवस निवडण्यात आला आहे. अभिजात भाषा हा वैशिष्ट्यपूर्ण भाषेला भारत सरकारद्वारे दिला जाणारा एक दर्जा आहे. केंद्र सरकारने अभिजात भाषेचे निकष ठरवलेले आहेत. भाषा प्राचीन आणि साहित्य श्रेष्ठ असावे. भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे. भाषेला स्वत:चे स्वयंभूपण असावेत. प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा. हा दर्जा ज्या भाषांना दिला जातो त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या-त्या राज्याला भरीव अनुदान मिळते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न सुरू होते. यासाठी महाराष्ट्र राज्य शासन तर्फे रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमून ५०० पानांचा अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीकरीता केंद्र सरकारने राज ठाकरेंच्या पुढाकाराने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. मराठी भाषा मुळातच अभिजात होती. तिला अभिजात दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्राने सनदशीर मार्गाने प्रयत्न केले. गेले दशकभर यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न करण्यात येत होते. या पार्श्वभूमीवर मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याचा तमाम मराठी भाषिकांना आनंद झाला आहे. तसंच मराठी भाषेच्या विकासासाठी आणखी ऊर्जा, प्रेरणा मिळाली आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने अभिजात भाषेतील स्कॉलर्ससाठी दरवर्षी दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळतात, अभिजात भाषेसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिज स्थापन करण्यात येतं, प्रत्येक विद्यापीठात अभिजात भाषेसाठी एक अध्यासन केंद्र स्थापन केलं जातं. प्राचीन ग्रंथांचे डिजिटलाझेशन, भाषांतर, प्रकाशन आणि अर्काईव्हिंग (संग्रहण) क्षेत्रात तरुणांसाठी रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतात. 'मराठी' भाषा ही आपली जननी आहे. या भाषेला समृद्ध इतिहास व परंपरा लाभलेली आहे. याच भाषेतून आपण आपल्या भावना, विचार प्रभावीपणे व्यक्त करीत आहोत आणि म्हणूनच काळाच्या ओघात भाषेच्या स्वरूपात कधीही बदल न होणारी, अलौकिक सौंदर्य लाभलेली कुलीन, सुसंस्कृत, उच्च, सभ्य व चिरकाल टिकणारी भाषा म्हणून आपण अभिजात भाषेला म्हणजेच पर्यायाने 'मराठी' भाषेला मनापासून मानतो. आपले राज्य महाराष्ट्र. आपल्या राज्याची मातृभाषा, राजभाषा ही मराठी. भाषेला आपण आपली आई म्हणतो. त्या अर्थाने आपली 'मराठी भाषा' आता ३ ऑक्टोबर २०२४ पासून 'अभिजात भाषा' म्हणून गौरविली गेली आहे. अभिजात भाषा म्हणजे चिरकाल टिकणारी व सौंदर्यप्रधान असलेली सुसंस्कृत भाषा होय. असे म्हटले जाते की, इ.स.पू.२०७ मध्ये ब्राम्ही लिपी आणि मराठी भाषेतील शिलालेख सापडला. इ.स.पू. तीनशे वर्षांपूर्वी मराठी भाषा बोलली जात होती. मराठी भाषेत काळानुरूप बदल होत गेले. आद्यकाल, यादवकाल, बहामनीकाल, छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ, इंग्रजांचा काळ आणि पेशवे काळ या दरम्यान मराठी भाषेत वृद्धी झाली. सर्वप्रथम सातवाहन राजांनी मराठी भाषेचा वापर व्यवहार, प्रशासनात केल्याचा दाखला मिळतो. त्यानंतर यादवांच्या काळात मराठी संस्कृती व भाषा भरभराटीस आली. इ.स.११८८ मध्ये आद्यकवी मुकुंदराज यांनी 'विवेकसिंधू' तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी इ.स.११९० मध्ये 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहून मराठी भाषेला राजाश्रय मिळवून दिला. इ.स.१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्वतंत्ररीत्या निर्मिती होऊन मराठी राजभाषा घोषित करण्यात आले. मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, रामदास, श्रीधर, मुक्तेश्वर, मोरोपंत यांच्यासह अनेक कवींना मराठी भाषेचे आद्य कवी मानले जाते. आता ही भाषा जगभरात ७२ देशांमध्ये व भारतातील ३६ राज्यात बोलली जाते. अधिकृत भाषांमध्ये मराठी भाषेला १५ वा क्रमांक मिळाला. सुमारे ११ कोटींहूनही अधिक लोक मराठी भाषा बोलतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. पण त्यासाठी केंद्र सरकारचे काही निकष ठरलेले होते. जसे-भाषेचा नोंदवलेला इतिहास हा अती प्राचीन स्वरूपाचा म्हणजे १५०० ते २००० वर्ष जुना हवा, प्राचीन साहित्य हवे, जे त्या भाषिकांना मौल्यवान वारसा वाटते, दुस-या भाषा समूहाकडून उसनी न घेतलेली अस्सल साहित्यिक परंपरा हवी, 'अभिजात' भाषा ही आजच्या भाषेपेक्षा निराळी हवी, असे प्रारूप ठरलेले असल्याने त्यानुसार मराठी भाषा ही अभिजातच आहे, यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून एक अभ्यासपूर्ण अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता. प्रारंभी जेव्हा ही भाषा बोलली गेली, तेव्हा महारठ्ठी-महरठ्ठी-मऱ्हाटी-मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला, असं या अहवालात म्हटलं आहे. महाराष्ट्रीय भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचं वय किमान अडीच हजार वर्षं जुनं असल्याचे पुरावे असल्याचेही या अहवालात म्हटलं आहे. त्यानुसार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करून 'मराठी भाषेला' गौरव मिळवून दिला. भारत सरकारने आतापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत, उडिया आणि आसामी अशा अकरा भाषांना हा अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळे आता या भाषांसाठी काही संस्था नव्याने उभारल्या जातील. तसेच या भाषांमधल्या प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक तरतूदही केली जाईल. मराठी भाषेसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये भरीव अनुदान स्वरूपात दिले जाईल. त्यामुळे मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे, भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे, प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व १२ हजार ग्रंथालयांना सशक्त करणे, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणा-या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा सा-यांना भरीव मदत करणे अगदी सुलभ होईल. त्या अर्थाने मराठी भाषेला लाभलेला हा अभिजात भाषेचा अलंकार निश्चितच गौरवणीय असाच आहे. एका बाजूला या सगळ्याचा जरी आनंद असला, तरी इतर भारतीय भाषांच्या तुलनेमध्ये मराठी भाषा ही आपल्या शहरात, राज्यात आजही परकीय आहे, दुय्यम स्थानावर आहे असे व्यवहारात वागत असताना जाणवते. आपल्या शहरात, राज्यात येऊन वर्षानुवर्ष राहणारे बॉलीवूडमधील कलाकार असतील, कॉर्पोरेटमधील अधिकारी असतील, नोकरी करणारे व्यावसायिक असतील, त्यांना आजही मराठी भाषा येत नाही, मराठी भाषा बोलली पाहिजे, असे वाटत नाही. आपल्या मुलांना मराठी सरकारी शाळेत दाखल करणे आणि त्या शाळांचा दर्जा उत्तम राहील, यासाठी प्रयत्न करणे मराठी पालकांना महत्त्वाचे वाटत नाही. मराठी सिनेमा, नाटक, साहित्य याला फार मोठी परंपरा आहे; परंतु ही परंपरा चढत्या क्रमाने पुढे जात राहावी यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. तसे घडताना दिसत नाही किंबहुना हा दर्जा ढासळतो आहे, असेच वाटत आहे. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने केवळ एक दिवस चर्चा करायची आणि एरवी आपली मुले देखील इंग्रजी शाळेत पाठवायची, याला काय म्हणावे? खरे तर आपल्या भाषेतील शब्दांचा वापर आणि जपणूक झाली पाहिजे. तसेच इतर भाषांमधील तंत्रज्ञानाशी संबंधित शब्द हे त्याच्या अर्थासहित समजून घेऊन आपल्या भाषेत त्यासाठी पर्यायी शब्द निर्माण झाले पाहिजेत. यासाठी भाषेवर प्रेम करणा-यांनी जागरूक असायला हवे. तसा कोणताही प्रयत्न मराठी भाषेच्या संवर्धनाच्या बाबतीत होताना दिसत नाही. मराठी भाषा शिकवणा-या प्राध्यापकांच्या मराठी भाषेचे वाचन आणि शिकवणे याविषयी चिंता करावी, अशी परिस्थिती अलीकडे अनेक महाविद्यालयात अनुभवायला मिळते. म्हणून केवळ मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला याचा आनंद व्यक्त करणे पुरेसे नाही. आपण सर्वच मराठी माणसांनी जाणीवपूर्वक आपली भाषा ही इतर भाषिकांनी शिकावी त्यातले ज्ञान, परंपरा, त्यातील शब्द सौंदर्य आणि शब्द संपदा आणि श्रीमंती इतरांनाही आपल्याला अनुभवायला देता यावी.


**सुनील शिरपुरे कमळवेल्ली, यवतमाळ भ्रमणध्वनी ७४९८८८५०६१**






